# ग्रामगीता आणि ग्रामीण वास्तव्य

**डॉ. सोपानदेव वि. पिसे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.

ओळखोनि श्रमाची प्रतिष्ठा । त्यांनी दाबावी कार्यनिष्ठा ।।
श्रमणा-यांच्या निवाराने कष्टा । स्वतः करोनिया ।।
जे जे नारी नर साक्षर असती ।त्यांना माझी नम्र विनंती ।।
वाचा ग्रामगीता अर्थ संगाती । समजानोवी द्या निरक्षरा ।।

'ग्रामगीता' मराठी साहित्याचा आणि मराठी अस्मितेचा एक अमूल्य ठेवा आहे. हा अमूल्य ठेवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना श्री क्षेत्र पंढरपूर या ठिकाणी सन 1953 मध्ये आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला स्फुरलेला होता. ती त्यांनी आपल्या धावत्या जीवन प्रवासात अवघ्या चार -पाच महिन्यांत लिहून पूर्ण केलेली होती. धावत्या जीवनप्रवासामुळे हे हस्तालिखीत गहाळ झाले. दैवयोगाने ते मिळाले आणि सन 1955 ला 'गीताजयंती' चा मुहूर्त साधून जनता जनार्दनाच्या सेवेत हे अमूल्य रत्न एकाच वेळी एक हजार ठिकाणी प्रकाशन सोहळयाचे आयोजन करुन प्रकाशित करण्यात आले. हा ग्रंथ महाराजांनी समाजाला दिलेला एक अमृतकुंभ आहे, याचे सेवन संत तुकारामांच्या ''फोडिले भांडार धान्याचा हा माल । तेथे मी हमाल भार वाही ।। सेवितो, हा रस वाटितो आणिका । घ्या रे होऊ नका रानभरी ।। या उक्तीप्रमाणे हा जीवनरस या अमृतकुंभातून सेवन करुन आपले जीवन सुकर सुंदर आणि सार्थक करुन घ्यावे अशी अपेक्षा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची होती. अवघाची संसार व्हावा सुखी । मंगलता निघो सर्वांमुखी ।। खळ, दुर्जनांचिही दुष्टी निकी । व्हावी सर्वथ ।। मित्रता नांदावी सर्व जनी । उणीव न दिसावी कोठे कोणी ।। जी जी इच्छा करिती प्राणी । व्हावी पूर्ण ती न्याये ।। या हेतूने राष्ट्रसंतांच्या ग्रामगीता या ग्रंथाचा सोळा भारतीय भाषांमध्ये अनुवाद करण्याचा प्रयत्न शासकीय स्तरावर झालेला अहो. सर्वसामान्य समाज या ग्रंथाचे घरोधरी व मंदिरांमध्ये नित्यपठन आणि चातुर्मासात वाचन मोठया उत्साहाने करीत आहेत. एवढेच नव्हे तर कीर्तन प्रवचनकार या ग्रंथाच्या आधारे किर्तनप्रवचन करुन या ग्रंथातील मतांचा प्रचार-प्रसार करतात. असा एक ज्ञानाचा अमूल्य ठेवा या राष्ट्रसंतांनी समस्त समाजाला देऊन ठेवला आहे. या ग्रंथासंदर्भात वैराग्यमूर्ती श्रीसंत गाडगेबाबा म्हणतात, ''कुरुक्षेत्रावर मायाजाळाच्या योगानं आलेला मोह दूर करुन, भगवंतानं अर्जुनाकडून त्यांच्या क्षात्रवृत्तीमुळं भागाला आलेलं लढाईच कर्तव्यकर्म करवून घेतलं. भगवंताला गीता सांगावी लागली. त्याचप्रमाणे समाजाला कर्मप्रवृत्त करण्यासाठी राष्ट्रसंतांनी ग्रामगीता सांगीतलेली आहे. गुलामीमें था वतन हमारा । तभी से रोता किसान सारा ।। अभी तो हालत बडी बुरी है । कभी इधर भी चला करोंगे ।। न बाल बच्चोंको सुख है । उनको बिमारिया रहत घेरी ।। न धोती साडी बदनपे अच्छी । कभी तो उनकी सल्ला करोंगे ।। टुटा छप्पर दिवार खिडकी । सदाकी थंडी धूप घरमें ।। नही ओढनेको, नही बिछाने जरा, कभी तो मिला करोगे ।। भारत हा कृषीप्रधान देश आहे. आदीकाळापासूनच शेतक-यांच्या जीवनमानाकडे, प्रगतीकडे दुर्लक्ष केले गेलेले आहे. शासनाकडूनही वेळोवेळी शेतक-यांची पिळवणूकच होत होती आणि आजही होत आहे. शेतकरी हा कर्जात जन्मणारा आणि कर्जातच मरणारा असा मानव प्राणी आहे. जगातील प्रत्ये उत्पाक आपल्या मालाची किंमत स्वतः निर्धारीत करतो, परंतु शेतक-याच्या मालाची किंमत व्यापारी निर्धारीत करतो, अशी शोकांतिका शेतक-याची आहे. आज आपला देश एकवीसाव्या शतकातील अत्याधुनिक सुख-सुविधांनी युक्त होत चालला आहे, पण ग्रामीण जीवन रोजच्या रोज कठीण आणि बिकट होत चालले आहेत. कारण आधुनिक आणि तांत्रिक सुख-सुविधांनी ग्रामीण माणसाला उद्ध्वस्त केले आहे. आज खेडी भकास होत चालली आहेत. खेडयांमधून आज लोकांचे शहराकडे पलायन सुरु झाले आहे. शेतीची कामे करायला कोणी तयार नाही ज्या शेतीला एकेकाळात उत्तम शेती, मध्यम

रोजगार, आणि कनिष्ठ नोकरी, अशा प्रकारेच सर्वश्रेष्ठ स्थान आणि शेतक-याजवळ शेतमाल आले की त्यांचे भाव पाडण्यात व्यापारी आणि मायबाप सरकार अग्रेसर असते. शेतक-यांजवळचे माल संपले की, शेतमालाची भाववाढ सुरु होते. व्यापारी गब्बर होत चालला आणि शेतकरी ज्याला बळीराजा ची संकल्पना देण्यात आली आहे त्याची मात्र दैना झाली आहे. गरिबीत, दारिद्रयात तो खितपत पडला आहे. आज ग्रामीण भागाती रोजगार संपत चालले आहेत. शेतीसोबत वनसंपदाही नष्टप्राय झाली आहे. आधीच्या काळात खेडी या स्वयंपूर्ण असायच्या पण आज ती स्थिती राहिलेली नाही. ही परिस्थिती संपूर्ण भारतातील खेडेगावांची आहे.यातून मार्ग काढणे आज गरजेचे झालेले आहे, त्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या, म. गांधींच्या, विनोबा भावेंच्या, संत गाडगेबाबांच्या विचारांची गरज आहे. कृषी आधारीत अर्थव्यवस्थेची गरज आहे. अनावश्यक खर्चाला आळा घालून सर्वसामान्य जनतेला प्राथमिक सुख-सुविधा कशा मिळतील याची व्यवस्था लावण्याची आज गरज आहे. ग्रामीण जीवनाला ग्रामीण भागातच रोजगार निर्मिती करुन त्यांच जीवन सुखमय करण्याची आज गरज आहे.शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे याची जाणीव ठेवून योग्य त्या उपाययोजनांची आज गरज आहे. जनतंत्राचा हा काळ । शक्ती लोकांअंगी सकल ।। जनतेच्या निश्चयाचे बळ । साम्राज्यासही नमवू शके ।। भांडवलशाही अर्थव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी व स्वयंपूर्ण ग्रामराज्य निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंतांनी ग्रामगीता लिहिलेली आहे. त्याची ग्राम कुटुंब योजना संपूर्णतः सहकारी तत्वावर उभी असली तरी व्यक्तिनिष्ठेपेक्षा ग्रामनिष्ठा व व्यक्तिहितापेक्षा ग्रामहिताकडे वळणारी अशीच आहे.आज भारताला स्वातंत्र्य मिळून जवळपास पासष्ट वर्षांचा कालखंड लोटला आहे. हया पासष्ट वर्षात एकाच राजकीय पक्षाने सर्वाधिक काळा देशाची सत्ता भोगलेली आहे, तीही महात्मा गांधींचे नाव घेऊन, पण गांधींचे नाव त्यांनी फक्त मते मागण्यापुरतेच वापरलेले आहे, असे दिसते. गांधींचा ग्रामस्वराज्याचा विचार मात्र लाल फडक्यात बांधून ठेवलेला दिसतो. भाषण देताना गांधींचा वापर केला पण हया महात्म्याच्या विचाराला या देशात अमंलात आणण्यासाठी कोणीच प्रयत्न केलेला नाही. गांधींनी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली पण ती प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही कारण त्यांची हत्या स्वातंत्र्याच्या अवघ्या सहा महिन्यातच झाली.

"स्वराज्याचं सुराज्य'' निर्माण व्हावं म्हणून राष्ट्रसंतांनी आपल्या हयातभर प्रयत्न केले, ही समाजसेवची प्रेरणा त्यांना म. गांधींपासून मिळाली, पण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गांधीजींचे शिष्य नव्हते. याचा खुलासा करतांना राष्ट्रसंत म्हणतात-"मै गांधी का नही शिष्य रहा, ना गांधी मेरे कहीं भक्त रहे । पर प्रेम था हम दोनों में बडा, वह मिट न सका कोई लाख कहें ।।'' स्वातंत्र्याच्या आधी स्वराज्याचा ध्यास घेतलेल्या राष्ट्रसंतांनी स्वातंत्र्य नंतर सुराज्याची स्थापना करण्यासाठी खेडयपाडयातूनच नाही, तर राष्ट्रपती भवनापर्यंत परिभ्रमण केले होते. ते फक्त बोलके कार्यकर्ते नव्हते, तर कर्ते सुधारक होते. सुराज्य कशाला म्हणतात, ते कसं असावं हे सांगताना ते म्हणतात "सुराज्य येण्यासाठी उभे पण, मार्ग मधातुनि रुकला ना ! धनिकलोभी पैसा सोडी ना, मजुर न कामा नेट धरी ।। शेत शक्ती वाढेल कशी? गोवंश वधाने दुखलाना!!" यामधून राष्ट्रसंतांनी स्वराज्याचे सुराज्य का झाले नाही याची कारणमीमांसाच सांगीतली आहे, पण आज हे मर्म समजायला कोणीच तयार नाही, सर्वजण ऐहिक सुखांच्या, भौतिक सुखाच्या मागे धावत आहेत. वातानुकुलीत खोलीत बसून गरिबांविषयीची नियमावली आणि अंदाजपत्रक तयार केले जात आहे. एकीकडे स्वदेशीचा नारा द्यायची अशी दुहेरी भूमिका आजचे आपले मायबाप सरकार घेताना दिसते.आपल्या देशातील गावखेडयातून चालणारे परंपरागत लघुउद्योग आज मृतप्राय स्थितीत गेलेले आहेत. आधीच्या काळात गावखेडी स्वयंपूर्ण असायची, पण आज ती स्वयंपूर्णता संपुष्टात आली आहे. ग्रामीण लघुउद्योग नष्ट झाले आहेत. शेतीत मुख्य पिकासोबत होणारे पर्यायी पिक आज पिकणे बंद झाले आहे. गरिबी हटाव च्या नावाखाली गरीब हटाव अशी अवस्था झालेली आहे.कागदोपत्री मोठमोठया योजना आखल्या गेल्या, पण सर्वसामान्यांपर्यत त्या पोहोचल्याच नाहीत. खेडी स्वयंपूर्ण करण्यासाठी मोठमोठया विद्वानांनी काथ्याकुट केले, पण योजना आलीच नाही आणि खेडी स्वयंपूर्ण झालीच नाहीत.मायबाप सरकारचा सुधारणांच्या संदर्भातील हेतू कधीही शुध्द राहिलेला नाही. त्यामुळे योजना आखूनही त्यांचे संचालन योग्यप्रकारे झालेले नाही.

शेतीच्या सिंचनासंबंधी योजना आखली जाते. तिच्या पूर्णत्वासाठी एक कालमर्यादा निश्चित केली जाते पण ती योजना त्या कालमर्यादेत पूर्ण केली जात नाही आणि तिचा खर्च वाढून ती अपूर्ण राहत असते. यात पैसा वेळ आणि श्रम वाया जात असतात. हळूहळू त्याची उपयोगिताही संपत असते. यात नुकसान मात्र खेडयांचे होते. गावक-यांचे जीवन उद्ध्वस्त होत असते. आज असंख्य गावांमध्ये प्राथमिक सोयी सुविधांचाही अभाव दिसतो. शिक्षण, आरोग्य, रस्ते, बाजारपेठ यासारख्या मुलभूत गरजाही हे आपले सरकार पूर्ण करु शकत नाही हे वास्तव पाहून राष्ट्रसंत ग्रामगीतेत म्हणतात, ‘‘आज भरपूर उत्पादन । हेचि जनसेवेचे साधन ।। त्यासाठी झटेल जो जो जन । गीता कळली तयासि ।। देशात कामांचा उभा डोगर दारिद्रय दुःखाचा वाहतो पूर । अर्धनग्न, अर्धपोटी लोक अपार । त्यांचे दुःख का न दिसे ।। परी ज्यांना होणे आहे साहेब । लोकांवरि कसावया रुबाब ।। न कष्टता इच्छिती आराम खूब । तेचि राहती बेकार ।। बेरोजगार कोण? याचे उत्तर राष्ट्रसंतांनी वरील ओव्यांमध्ये दिले आहे. ऐतखाऊ श्रम करण्याची लाज बाळगणारे लोक आज बेरोजगार आहेत, असे राष्ट्रसंत म्हणतात. एकीकडे बेरोजगारांची फौज तयार आहे, तर दुसरीकडे कामगार श्रमिक शेतीत श्रम करणारे मिळत नाही. ज्यामुळे अनेक उद्योग, शेतीव्यवसाय बंद पडत चालले आहेत. आज शेतीत काम करायला कोणीही तयार नाही. कारण काय तर शरीराचे सौंदर्य नष्ट होते, उन्हा तान्हात काम करावे लागते. दुसरी बाब म्हणजे श्रमाला योग्य मोबदला मिळत नाही. हे सर्व ऐतखाऊ कमी श्रमात अधिक मोबदला मिळविण्याच्या नादात असलेले असे लोक वाममार्गाला लागून समाजाला अपाय करीत असतात. ज्यामुळे देशाच्या सुक्षेलाच धोका उत्पन्न झालेला आहे. जेव्हा पोटासि भूक लागे । तेव्हाचि घरोघरी काम मागे ।। नाहीतरि आळस घेवोनि संगे । खुशाल पडे झोपडीमाजी ।। ही परिस्थिती आज संपूर्ण देशात आहे. याचे चिंतन कोणी करायला तयार नाही, आज दोन वेळचे जेवन मिळाले की झाले, उद्याचे उद्या पाहू, ही प्रवृत्ती आज बहावत चाललेली आहेत्र त्यात मायबाप सरकार मतांच्या राजकारणासाठी अन्न धान्याचे दर श्रमजिवी लोकांसाठी दारिद्रयरेषेखालील लोकांसाठी एक रुपये, दोन रुपये किलो तांदुळ गहू करुन देत आहे त्याचाही परिणाम ऐतखाऊपणा आणि आळशी प्रवृत्तीला कारण होत आहे.

आज आपल्या समाजात भ्रष्टाचार मोठया प्रमाणत बोकाळलेला आहे. आज भ्रष्टाचार करुन दुस-यापेक्षा मी श्रीमंत कसा होतो, आणि त्याच्यापेक्षा भ्रष्टाचारात पुढच्यापेक्षा आणखी पुढे कसा जातो यची एक प्रकारची स्पर्धाच लागली आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्यापेक्षा दुस-याचे दोष दखविण्याची स्पर्धा करीत आहे. सरळमार्गाने समोर जाणा-याला अडवून आपली पुंगी वाजविण्याची स्पर्धा लागलेली आहे. शिक्षणाकडे नोकरी मिळण्याचे एक साधन म्हणून पाहिले जात आहे. शिक्षणाच्या माध्यमातून योग्यता संपादन करुन चांगला उद्योग-व्यवसाय करण्याचा विचार करताना आजची युवा पिढी दिसत नाही. शिक्षणात वाम मार्गांचा वापर करुन पदव्या संपादन करण्याकडे कल आजच्या युवा पिढीत दिसतो. अशा शिक्षिताला परिश्रम करण्यात लाज वाटत असते. त्याला वाटते, शिक्षण घेणा-याने फक्त ‘साहेब‘ बनावे. श्रम करणा-यावर आपली सत्ता गाजवावी. शारीरिक मेहनत न करता जास्त मिळावे, ही प्रवृत्ती आज समाजात वाढत आहे. या प्रवृत्तीमुळे आपल्या राष्टाचे फार मोठे नुकसान होत आहे.

‘धन ही गावाची संपत्ती‘ असे सुधारणावादी विचार रुजवावे लागतील. राजकारण्यांना, उद्योजकांना आणि जमीन माफियांना त्यांची जागा दाखवून आपल्या ग्रामीण भागाला स्वयंपूर्ण बनवावे लागेल. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा गावातील लघुउद्योग पुनर्जिवीत होतील. शेतीला जोडधंद्याची जोड करावी लागेल. अकृषक शेतीला कृषक बनवावी लागेल. उद्योगपती भांडवलदारांची मक्तेदारी संपवावी लागेल. ते आपल्या फायद्यासाठी ज्या योजना राबवीत आहेत त्यांचा निषेध करावा लागेल, या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात, ‘‘ कच्चा माल मातीच्या भावे । पक्का होता चौपटीने घ्यावे । सांगा मग कैसे ग्रामस्थजन सुखी व्हावे । पिकवूनी उपाशी ।।‘‘ हे दृश्य आपण आज उघडया डोळयांनी पाहत आहोत. आज गावातील अर्थव्यवस्था संपूर्णतः मोडकळीस आली आहे. गावागावात कष्टकरी, श्रमजीवी, ग्रामीण कलावंत, कारागीर यांची उपासमार होत आहे. यांच्या हाताला काम नाही, पोटाला अन्न नाही अशा प्रकारची दयनीय स्थिती सर्वत्र दिसून येते. ही

स्थिती बदलली पाहिजे. गाव समृध्द केले पाहिजे. सरकारपुढे सतत हात पसरण्याची लाचारी सोडावी लागेल यासाठी – ''प्रत्येक घटक सज्ञान । पाहिजे निरोगी, उद्योगी संपन्न । म्हणोनि प्रत्येकाने आपुल्या गावी । ग्रामीण वस्तूंना चालना द्यावी । त्यास सुधारणाही घडवावी । उन्नती व्हाया कलावंताची ।।'' असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात. ही अपेक्षा आहे राष्ट्रसंतांची, पण आज आपल्याला चित्र अगदी उलटे दिसले. त्या चित्राला बदलणे आपल्या हाती आहे. ते बदलण्याची प्रक्रिया आता सुरु करावी लागणार आहे. त्यासाठी खेडी स्वयंपूर्ण करावी लागतील. या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात, '' शहराकडे चालला प्रवाह । तो थांबवावा निःसंदेह । सर्वांच गावीच होईल निर्वाह । ऐसी योजना करावी ।। खेडेची शहराचे जनक । शहर भोक्ते, खेडे उत्पादक । शहराकडे न जाता लोक । धावावे उलट खेडयाकडे ।।'' हे गावाचे वास्तव राष्ट्रसंतांनी सांगितले आहे. ते म्हणतात, गावातल्या वस्तू गावात विकल्या जातील यची सोय करावी लागेल. शेतीला परंपरेची आणि आधुनिकतेची साथ देऊन तिचा विकास करावा लागेल. गावाला समृध्द करावे लागेल. त्यासाठी सुशिक्षित लोकांना गावक-यांना शिक्षित करावे लागेल. शेतकरी, शेतमजूर यांना कर्जमुक्त करावे लागेल. आपल्या देशाची पंचवार्षिक योजना आखताना त्यत शेतीला स्थान द्यावे लागेल. सिंचनाची सोय करतांना सर्वसमान्य शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी लोकांचा विचार करावा लागेल, त्यांना जागृत करावे लागेल, नाही तर आजचे लबाड राजकारणी शेतक-यांसाठी तयार केलेल्या सिंचनाच्या साधनांचा आणि योजनांचा वापर उद्योग जगतात करताना दिसतात. शेतक-यांना सिंचनापासून वंचित करतात. या लबाड राजकारण्यांच्या जोखडातून या श्रमजिवी, कष्टकरी शेतक-याला आणि त्याच्या शेतीला मुक्त करणे क्रमप्राप्त झाले आहे. शेतीला सुगीचे दिवस आणावे लागतील, अन्यथा गाव संपूर्णतः ओस पडतील आणि शहरे फुगलेली तर आहेतच ती अधिक फुगत जातील त्यामुळे अराजकता माजेल. ओस पडत असलेल्या खेडयांना पुन्हा समृध्द पुन्हा समृध्द करणे गरजेचे आहे. शहरात गेलेल्या आणि ऐतखाऊ झालेल्या लोकांना पुन्हा गावाकडे वळवावे लागेल, श्रमाला पर्याय नाही याची जाणीव या शहरी मानसिकतेत जागृत करावी लागेल. ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा, प्रबोधनाचा आणि चिंतनाचा विषयच मुळात समाज, राष्ट्र, आणि परिवर्तन असून या परिवर्तनाच्या चळवळीचे यशस्वी नेतृत्व ते करतांना दिसतात. भारताच्या सामाजिक, राजकीय,आणि धार्मिक विकासाकरीता आजपर्यंतच्या तत्ववेक्त्यांनी केलेल्या कार्याचा समन्वय साधून सर्व विचारांचे एकत्रीकरण त्यांनी केले आहे. त्या रचनेच्या आधारावर नवा भारत निर्माण करण्याचे स्वप्न राष्ट्रसंतांनी पाहिले होते. एकंदरीत अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी असलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राष्ट्राला समर्पित अशी वैराग्यमूर्ती होते हे निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भ सूची –**


१. ग्रामगीता – लेखक वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री. वसंत देवीदास काटोले, 'ग्रामगीता प्रकाशन', द्वारा प्रिन्टर्स ट्रेडींग कंपनी अभ्यंकर पुतळा, नागपूर.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : जीवनदर्शन – लेखक डॉ. जुल्फी शेख, मध्यमा प्रकाशन, नागपूर.
३. राष्ट्रसंतांची जनचेतना – लेखक – ज्ञानेश्वर रक्षक, प्रकाशन– मराठी जगसाहित्य परिषद, गणेश कॉलनी, अमरावती.
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संम्मेलन पाचवे, स्मरणिका,दि. ८ फेब्रुवारी २००३.
५. ''खंजिरी'' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन, सहावे, स्मरणिका.